कार्यालय
सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर
आवक क्र. ........................
6968
05 JAN 2012
सहाय्यक आयुक्त का. अ.

गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याच्या योजनेमध्ये सुधारणा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन निर्णय क्रमांक : गटई २०११/प्र.क्र.१४७/मावक-२

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ८/१२/२०११.

वाचा :

१ शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्रमांक-विघयो-१०९७/ प्र.क्र. १७५/ मावक-२, दि. ३१/१२/१९९७

२ शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्रमांक-विघयो-२००५/ प्र.क्र. १५१ मावक-२, दि. २३/११/२००६

३ शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-विघयो-२००५/प्र.क्र. १५१/मावक-२, दि. २८/१२/२००६

४ शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-गटई-२००६/ प्र.क्र. २०९/मावक-२, दि. २१/६/२००७

५ शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-गटई-२००६/ प्र.क्र. २०९/मावक-२, दि. १३/२/२००८

६ शासन शुध्दिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-गटई-२००६/ प्र.क्र. २०९/मावक-२, दि. २४/१२/२००८

७ शासन शुध्दिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-गटई-२००६/प्र.क्र. ३०७/०७/भाग-१/ मावक-२, दि. ६/७/२००९

८ शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: इबीसी २००८/प्र.क्र.२०७/मावक-२,दिनांक १४ फेब्रुवारी,२०११

९ शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: गटई २०११/प्र.क्र.१०१/मावक-२,दिनांक २९/७/२०११

प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्यामध्ये चामडयाच्या वस्तु व पादत्राणे दुरुस्तीच्या क्षेत्रात मोठया प्रमाणावर अनुसूचित जाती प्रवर्गातील व्यक्ती असून, त्यांच्या उपजिविकेचा प्रश्न यांच्याशी निगडीत आहे. हे पादत्राणे दुरुस्ती करणारे व्यावसायिक हे रस्त्याच्या कडेला उन्हातान्हात बसून आपली सेवा देत असतात. या व्यावसायिकांना ऊन, वारा व पाऊस यापासून संरक्षण मिळावे व त्यांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी

ग्रामपंचायत नगरपालिका क्षेत्रात १०० टक्के अनुदानावर गटई कामगारांना गटई स्टॉल देण्याची योजना शासन निर्णय दि.३१/१२/१९९७ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजना सन २००२-०३ पर्यंत शासनामार्फत राबविण्यात येत होती.

सन २००३-०४ पासून ही योजना संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांचेकडे सोबविण्यात आली. तथापि, सन २००३-०४ व २००४-०५ या वर्षात महामंडळाला ही योजना राबविता आलेली नाही. त्यामुळे सन २००५-०६ पासून ही योजना शासनाकडून राबविण्याचा निर्णय झाला होता. परंतू शासनामार्फत सदर योजना राबविण्यामध्ये अडचणी आल्याने ही योजना पुन्हा सन २००६-०७ पासून संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ यांचेमार्फत राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. त्यास अनुसरुन महामंडळामार्फत ही योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेची अंमलबजावणी प्रत्यक्षात संचालक,समाज कल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत होत असल्याने सदर योजना संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे यांच्यामार्फत राबविण्याचा शासनाने निर्णय घेऊन उपरोक्त अनु.क्र.८ येथील दिनांक १४/२/२०११ च्या आदेशान्वये सदरहू योजना संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांच्या ऐवजी संचालक, समाजकल्याण, पुणे यांच्यामार्फत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि सदरहू शासन निर्णय झाल्यानंतरही सदरहू योजनेला आवश्यक ती गती प्राप्त झाली नसल्याने या योजनेबाबत लोकप्रतीनिधींकडून सतत होणारा पाठपुरावा विचारात घेता सदरहू योजना पुन्हा संचालक, समाजकल्याण, पुणे यांच्या ऐवजी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांचेमार्फत राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय :**

राज्यातील गटई कामगारांना ऊन, वारा व पाऊस यापासून संरक्षण मिळावे तसेच त्यांची आर्थिक उन्नती व्हावी याकरिता ग्रामपंचायत नगरपालिका व महानगरपालिका व छावणी क्षेत्रात (कॅन्टोमेंट बोर्ड) क्षेत्रामध्ये १०० टक्के शासकीय अनुदानातून गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना

संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे यांच्याऐवजी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांचेमार्फत राबविण्यास शासन मान्यता देत आहे.

२. गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याच्या योजनेच्या नियम व अटीबाबत शासन निर्णय दिनांक १३/२/२००८ मधील नियम व अटीमध्ये कोणतेही बदल नाहीत.

३. याबाबत होणारा खर्च "२२२५ - अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागास वर्ग यांचे कल्याण ०१ -अनुसूचित जातीचे कल्याण, १०२ - आर्थिक विकास पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना (०३) (०२) गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना (२२२५ २६२ २) ३१ सहाय्यक अनुदान,मागणी क्रमांक एन ३" या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून त्याखालील मंजूर वित्तीय तरतूदीमधुन भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक क्रमांक २०१११२०८११३७४९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( दिनेश वाघमारे )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.मुख्यमंत्र्याचे सचिव
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोग, मुंबई
अध्यक्ष, सफाई कर्मचारी आयोग, महाराष्ट्र, मुंबई
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
व्यवस्थापकीय संचालक, लिडकॉम, मुंबई
संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी, मुंबई

महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता)
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व समाजकल्याण अधिकारी, गट-अ जिल्हा परिषद
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षक, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व महानगरपालिका/ नगरपालिका/ जिल्हा परिषद/ कॅन्टोमेंट बोर्ड
सर्व उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई
संगणक कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई (शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्दीकरीता)
निवड नस्ती, मावक-२.

-----------

D:\S.S.Benke GR-Mavk-2-2011
एच-२३८७ -२३।•